RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ५, अंक ६१] सोमवार, डिसेंबर २३, २०१९/पौष २, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### जाहीर सूचना

[महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ६१(१) अन्वये]

क्रमांक कडोंमपा/नरवि/३५८०

ज्याअर्थी, शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास योजनेस व विकास नियंत्रण नियमावलीस मंजुरी प्रदान केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महापालिका क्षेत्रामधील उत्तर कल्याण विभाग (मौजे सापाड व वाडेघर) येथील २९४.८० हेक्टर क्षेत्राचा सुनियोजित विकास करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेखिलेला) चे कलम ५९ ते ११२ (नगररचना परियोजना तयार करणे) नगररचना परियोजना क्रमांक १ व २ राबविणेची कार्यवाही करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, सदरहू नगररचना परियोजना क्रमांक १ व २ चा इरादा उक्त अधिनियमाचे कलम ६०(१) व ६०(२) अन्वये, जाहीर करण्याबाबत मा. सर्वसाधारण सभेनी ठराव क्रमांक ६३, दिनांक १० सप्टेंबर २०१८ नुसार दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदर परियोजनेचा इरादा **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** दिनांक १५ सप्टेंबर २०१८ रोजी व दैनिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक १७ सप्टेंबर २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ६१(१) अन्वये महानगरपालिकेने प्रारूप नगररचना परियोजना क्रमांक १ व २ चा प्रारूप मसुदा मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सल्लामसलतीकरिता दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सादर केला असता त्यांनी संचलनालयाचे अभिप्राय दिनांक ३० ऑगस्ट २०१९ रोजीचे पत्रान्वये महापालिकेस कळविलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रारूप नगररचना परियोजना क्रमांक १ व २ चा प्रारुप मसुदा उक्त अधिनियमाचे कलम ६१(१) अन्वये नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणेस्तव मा. सर्वसाधारण सभेनी ठराव क्रमांक ८०, दिनांक २० डिसेंबर २०१९ नुसार मान्यता दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ६१(१) अन्वये उक्त प्रारूप नगररचना परियोजनेचा मसुदा, नकाशा व इतर तपशील सहायक संचालक, नगररचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे कार्यालयामध्ये निरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, महापालिका क्षेत्रामधील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, प्रारूप नगररचना परियोजना क्रमांक १ व २ च्या प्रारूप मसुद्याबाबत ज्या नागरिकांस हरकती/सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी लिखित स्वरूपात ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून तीस (३०) दिवसाचे आत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सहायक संचालक, नगररचना, यांचे कार्यालयामध्ये सादर करावे.

**अण्णासाहेब मिसाळ,**
आयुक्त,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

कल्याण,
दिनांक २१ डिसेंबर २०१९.

## KALYAN-DOMBIVLI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

### Notice

[As per the section 61(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966]

No. KDMC/NRV/3580

Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Development Plan and Development Control Regulations of Kalyan-Dombivli Municipal Corporation ;

And whereas, the Northern part of Kalyan, comprising of 294.80 Hectare area of village Sapad and Wadeghar is proposed to be developed in planned manner by preparing 'Town Planning Scheme' for this area, as per section 59 to 112 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as ''the said Act'') ;

And whereas, the General body of Kalyan-Dombivli Municipal Corporation has passed the resolution No. 63 dated 10th September 2018 for declaring the intention of Town Planning Scheme No. I and II, and accordingly the intention was published in the *Government of Maharashtra Gazette* on date15th September 2018 and in local Newspapers on date 17th September 2018 ;

And whereas, the Draft Town Planning Scheme No. I and II was submitted to the Director, Town Planning, Maharashtra State, Pune for consultation, on date 12th December 2018, and the Directorate of Town Planning has given consultation report on the said Draft Town Planning Scheme No. I and II *vide* their letter dated 30th August 2019 ;

And whereas, the General body of Kalyan-Dombivli Municipal Corporation has passed the resolution No. 80, date 20th December 2019 to publish the Draft Town Planning Scheme No. I and II as proposed, as per section 61(*1*) of the said Act ;

And whereas, the details of the Draft Town Planning Scheme No. I and II are available/displayed at the Office of Assistant Director, Town Planning Department, Kalyan-Dombivli Municipal Corporation, for inspection of general public.

Therefore, I hereby inform all citizens regarding suggestions/objections if any, to the Draft Town Planning Scheme No. I and II should be communicated in writing to Assistant Director, Town Planning Department, Kalyan-Dombivli Municipal Corporation within 30 days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*.

ANNASAHEB MISAL,
Commissioner,
Kalyan-Dombivli Municipal Corporation.

Kalyan,
dated 21st December 2019.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.